**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

# प्रेसनोट

दिनांक:- २५/०४/२०१८

## सिन्नर शहरातुन गावठी कट्टयासह ०२ जिवंत काडतुसे हस्तगत - स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे आदेशान्वये जिल्हयातील सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी धडक कारवाई सुरू आहे. जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशननिहाय सराईत गुन्हेगारांची माहिती घेवुन प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार नाशिक ग्रामीण **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर लक्ष ठेवुन गोपनीय माहिती काढणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे दिनांक २४/०४/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी सिन्नर शहरात गस्त घालुन गुन्हेगार चेकिंग करीत होते. दरम्यान स्थागुशाचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना गुप्त बातमी** मिळाली की, सिन्नर ते शिर्डीरोड वरील कुंदेवाडी फाटयावर काही संशयीत इसम हे विनापरवाना अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगुन आहे बाबत समजले वरून स्थागुशा पथक व सिन्नर पोलीसांनी कुंदेवाडी फाटा परिसरातुन इसम नामे **अक्षय शिवाजी पोटे, रा. कुंदेवाडी, ता.सिन्नर** यास शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीची जागेवरच अंगझडती घेतली असता, त्याचे **कमरेला एक देशी बनावटीचा गावठी कट्टा व पॅन्टचे खिशात ०२ जिवंत काडतुसे** मिळुन आले, तसेच एक विनानंबर असलेली बजाज पल्सर मोटर सायकलही सदर आरोपीकडुन हस्तगत करण्यात आली. सदर गावठी पिस्तुल बाबत विचारपुस करता त्यास त्याचे साथीदार नामे **दिपक सुभाष कलकत्ते व आबा वारूळे**, दोघे रा. पांगरी, ता. सिन्नर यांनी सदर पिस्तुल ठेवण्यासाठी दिले असल्याचे सांगितले असुन वरील तीनही आरोपींविरूध्द सिन्नर पोलीस ठाणे ॥ गुन्हा रजि. नं. ५१/२०१८ **भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सिन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. मुकूंद देशमुख, स्थागुशाचे पोहवा प्रकाश चव्हाणके, रवि वानखेडे, पोना दिलीप घुले, प्रितम लोखंडे, पोकॉ किरण काकड, विशाल आव्हाड तसेच सिन्नर पो.स्टे.चे पोना गवळी, पोकॉ दराडे अशांचे पथकाने संयुक्तरित्या सदरची कामगिरी केली आहे.